# - महिलोन्नती -

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः।

जिथे स्त्रियांचा गौरव केला जातो ते स्थान देवांनाही प्रिय असते. देवता तिथेच निवास करतात आणि जिथे स्त्रियांचा गौरव केला जात नाही तिथे सर्व क्रिया निष्फळ ठरतात. या वस्तुस्थितीची जाण असणारे राष्ट्रसंत वंदनीय तुकडोजी महाराज आपल्या ग्रामगीतेत मातृशक्तीला सन्मानाचे स्थान देतात. ग्रामगीतेच्या मध्यावरील विसावा अध्याय त्यांनी आपली आई माय मंजुळेला अर्पण केला आहे. त्यात सहृदय, सहनशील, कष्टाळू अशा आपल्या मातेचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. या मातृमंगलतेच्या गौरवाचा धागा थेट उपनिषदांपर्यंत जाऊन पोहोचतो.

उपनिषदात समावर्तन प्रसंगी गुरु शिष्याला उपदेश करताना सांगतात – "मातृदेवो भव" पहिला सन्मान मातेचाच आहे. मग त्यापाठोपाठ पिता, आचार्य येतात. आणि योग्यच आहे ते! मातेची थोरवी गुरुपेक्षाही अधिक आहे. किंबहुना पहिली गुरु आईच तर असते. एक उत्तम आई आपल्या अपत्याच्या व्यक्तिमत्वाला आकार देत असते. तुकडोजी महाराजांच्या जडण-घडणीत त्यांची आई मंजुळादेवी यांचा फार मोठा वाटा आहे.

इतिहासात, पुराणातसुद्धा आईच्या महानतेचे दाखले सापडतात. हिरण्यकशिपुसारख्या दैत्याच्या कुळात जन्माला आलेला प्रल्हाद बालपणीच नारायणाचा निःस्सीम भक्त झाला. याला कारण त्याची आई कयाधू ही गर्भवती असताना देवर्षि नारदांच्या आश्रमात राहत होती. त्यामुळे गर्भावर उत्तम संस्कार झाले आणि पुढे कयाधूने ते संस्कार जोपासले. त्यातूनच प्रल्हादाची भगवद् भक्ती वाढीला लागली. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांची आई जिजामाता यांनी रामायण महाभारतासारख्या स्फूर्तिदायक कथांमधून बाल शिवाजीमधील ओज जागवले, त्याला वीररसाचे स्तन्य पाजले आणि त्यातूनच प्रेरणा घेऊन मोगलांना पराभूत करून छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. देवकीच्या पान्ह्यातूनच कान्हा घडला. भगवान श्रीकृष्ण म्हणून त्याची कीर्ति त्रिखंडात दुमदुमते आहे. किती म्हणून उदाहरणे सांगावी! कोणत्याही आदर्श व्यक्तीच्या मागे त्याच्या आईचे संस्कार निश्चित असतात.

ती स्वतः खस्ता खाऊन कुटुंबातील लहानमोठी कामे आनंदाने, न कंटाळता करतच असते. स्त्रीमुळेच घराला घरपण येते.

स्त्री-पुरुष ही संसाररथाची दोन चाके मानली जातात. सर्वसामान्यपणे पुरुष हा कमावून आणतो तर स्त्री निगुतीने त्याचा विनियोग करते. पुरुष हा जर शिव असेल तर स्त्री ही त्याची शक्ती आहे. तो जर प्राण असेल तर ती राधे आहे. तो जर पुरुष असेल तर ती प्रकृति आहे. तो कळस असेल तर ती पाया आहे. एकाशिवाय दुसरे अपूर्णच आहे. हे जरी खरे असले तरी जेव्हा गृहिणी घरात नसते तेव्हा ते घर अगदी केविलवाणे वाटते. गृहिणी गृहमुच्यते। बाईमुळेच घराची शोभा वाढते. आणि याच स्त्रीशक्तीचा इथे गौरव केला आहे.

मात्र हे जरी कितीही खरे असले तरी याला दुसरी एक बाजू सुध्दा आहे. आणि ती विचारात घेतल्याखेरीज स्त्रीची महनता सिध्द होणार नाही. "स्त्री ही पुरुषाच्या मार्गातील धोंड आहे. वैराग्यप्राप्तीमधील सर्वात मोठा अडथळा म्हणजे स्त्री आहे. स्त्रियांना ज्ञानाचा अधिकार नाही. स्त्री व पशू सारखेच आहेत. किंवा स्त्रियांकडे केवळ भोग्य वस्तू म्हणून पहावे." या विधानांमुळे स्त्रीविषयीचा आदर उणावतो, मनाचा संभ्रम वाढतो. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. स्त्री ही देवी नाही किंवा दासी नाही. स्त्री ही काही पुरुषाची वैरिणी नाही. मात्र स्त्री-पुरुषांमध्ये निसर्गतः भेद आहे. आणि ग्रामगीतेत तो ठळकपणे समोर येतो. अनेक थोर महात्म्यांनी आपल्या विरागी वृत्तीला सांभाळण्यासाठीच केवळ स्त्रीची तात्त्विक दृष्टीने निंदा केली आहे. पण ते तेवढेच। कारण त्यांनी तिच्या माऊलीपणाला दोष दिलेला नाही. उलट ज्यांनी वैराग्यासाठी स्त्रीला दूर सारले त्यांनी डोळसपणे साधना केली व शेवटी तिला आदराने वंदन केले आहे.

वास्तविक आईसारखा मायाळूपणा इतरत्र आढळणार नाही. माऊलीच्या सहजकर्मालाच जगात मानवधर्म म्हटले जाते. अनेक थोर संत किंवा दिव्य विभूतींना माऊली म्हटले जाते. मग ते ज्ञानेश्वर माऊली असो की गंगामैय्या। भारतमाता, गोमाता भूमाता असे संबोधून आपण त्या त्या दैवतांविषयीचा सर्वोच्च

कृतज्ञताभावच व्यक्त करत असतो. पुरुषाच्या हृदयाला जितके समजणार नाही तितके स्त्रीहृदयाला समजते. घरातील आला गेला पै-पाहुणा, सणवार हे सर्व स्त्रीच जातीने बघत असते. पुरुषाच्या मनाला एखादी चिंता सतावत असेल तर ते स्त्रीला न सांगता चटकन समजते. एवढेच नाही तर अशा वेळी घरची लक्ष्मी त्यावर उपायही सुचवते. अशुभाची चाहूल पुरुषापेक्षा स्त्रीला लवकर लागते. ती सदैव दक्ष असते.

स्त्री ही दक्ष कारुणी असते असे तुकडोजी महाराज म्हणतात. ती करुणेची व सावधानतेची मूर्ती असते. तर पुरुष हा पिंडवर्गी म्हणजेच प्रत्यक्षाला महत्त्व देणारा असतो. स्त्री पुरुषातील हे गुण वरवर परस्परविरोधी भासले तरी ते तसे नाहीत तर उलट परस्परपूरकच आहेत. या दोघांच्या स्वभावातील उत्तमोत्तम गोष्टी जर एकत्र आल्यातर इथेच वैकुंठ अवतरले. उत्तम पुरुष आणि उत्तम स्त्री यांचा सुखाचा संसार म्हणजे पृथ्वीवरील नंदनवन! दोघांनी जर एकमेकांना समजून सांभाळून घेतले ना तर या सृष्टीचा स्वर्ग होईल. त्यातून पुढची पिढी अधिक जागरूक, जबाबदार व कार्यक्षम होईल.

अशा स्त्रीशक्तीचा गौरव अगदी वेदांनीही केला आहे. गार्गी, मैत्रेयी, सुलभा, घोषा, अपाला, लोपामुद्रा अशा ब्रह्मवादिनी स्त्रिया शास्त्रार्थ करीत होत्या. अनेक स्त्रिया विविध कला, विद्या यामध्ये पारंगत होत्या. तसेच सप्तशतीमध्ये रणचंडिकेच्या उग्र रूपाचे वर्णनही आढळते. पूर्वी अनेक रणरागिणी स्त्रियांनी युद्धात सशस्त्र सहभागही घेतला आहे, तसेच पावित्र्य व पातिव्रत्य जपण्यासाठी जोहारही केला आहे. स्त्री ही फुलाहूनही कोमल असली तरी प्रसंगी वज्राहूनही कठोर होऊ शकते. ती पुरुषांना मोहवते तशीच स्वतः वैरागिणी सुध्दा होऊ शकते. ती महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती अशा अनेक रूपांनी प्रगट होत असते. प्रसंगानुसार बदलण्याची लवचिकता तिच्यात नक्कीच आहे.

अशा स्त्रीजन्माचा नुसता स्वीकार नव्हे तर सत्कार व्हायला हवा. मुलीचा जन्म हा काही अपशकुन नाही तर उलट तो सृजनाचा सोहळा आहे. स्त्रीशिवाय नवनिर्मिती नाही. उत्पत्तीच्या

साखळीतील तो एक दुवा आहे. मुलींवर बालपणापासूनच उत्तम संस्कार व्हायला हवेत. तरच तिच्या आंतरिक गुणांचा विकास होईल. दया, क्षमा, शांति, श्री, कीर्ति या सद्गुणांची वृद्धी मुख्यतः स्त्रीमुळेच होते. तिच्या अंगी जात्याच टापटीप, सौंदर्यदृष्टी असते. अशा स्त्रीचे नीटनेटके घर म्हणजे तिच्यातील सात्त्विक गुणांचा आरसा असतो. म्हणून अशा स्त्रियांचा गौरव करावा. त्यांच्या गुणांना बळकटी आणावी, प्रोत्साहन द्यावे, शक्तीयुक्तीने भरावे. एवढ्यानेच गावात सुख शांति नांदेल आणि पर्यायाने राष्ट्राची भरभराट होईल.

मुलांसाठी शिक्षणाच्या जशा विविध योजना आहेत त्या मानाने स्त्रियांसाठी शिक्षणशाखा कमी प्रमाणात आहेत. गृहविज्ञान शाखेच्या माध्यमातून समाजाला आदर्श गृहिणी मिळते.

मुलामुलींच्या मनात नैतिक भाव जागृत ठेवून सहशिक्षण दिले तर समाजातील नीतिमत्ता टिकून राहील. परस्परांविषयी विकृत आकर्षण राहणार नाही. तसेच अनास्थाही राहणार नाही. स्त्री-पुरुष ही समाजरथाची दोन्ही चाके मजबूत असावीत. ती जर योग्य गतीने चालत राहतील तरच समाज निरोगी व स्वस्थ रहायला मदत होईल.

आजची लहान मुलगी उद्याची आई होणार आहे. त्या दृष्टीने ती निरीक्षणातून शिकणार आहे. त्यासाठी महिलांचे समुदायही असणे आवश्यक आहे. हळदीकुंकू, तिळगूळ समारंभ, शारदोत्सव यासारख्या कार्यक्रमातून त्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. सहभोजनातून पदार्थाबरोबर विचारांची देवाणघेवाण होते. नवनवीन रूढी, परंपरांचा परिचय होत जातो. अनुभवविश्व विशाल होत जाते. स्त्रीमध्ये व्यापकता व मर्यादशीलता यांचा सुरेख संगम असावा. पुरुषाच्या कार्याविषयी काही प्रमाणात ज्ञान निश्चितपणे असावे. यातूनच ज्ञानाचा आवाका वाढत जातो. तरीही ज्ञानाला विनम्रतेचे कुंपण असावे. यातूनच भावी माता पिता तयार होतील आणि उद्याच्या उज्वल राष्ट्राचे भवितव्य त्यांच्या हाती असेल. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी असे म्हटले आहे ते सर्वस्वी खरे आहे.

— माधवी जोशी.

©www.madhaveeraghuveer.com